# प्रसिद्धी पत्रक

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीयांना परकीय चलनातून देणगी स्वीकारण्यास मान्यता

शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनाला येणारे भाविक बाबांच्या झोळीत भरभरून दान अर्पण करत असतात. आता भारत सरकारच्या, केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेल्या परवानगीमुळे परकीय चलनातील दान भाविक बाबांच्या चरणी अर्पण करू शकणार आहेत.

शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनाकरिता भाविकांची नेहमीच गर्दी असते. येणाऱ्या भाविकांमध्ये देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांची संख्याही लक्षणीय असते. येथे येणारे भाविक बाबांच्या चरणी रोख, ऑनलाईन, युपीआय, मनीऑर्डर, चेक-डीडी या माध्यमातून देणगी देत असतात.

आता भारत सरकारच्या केंद्रीय गृह मंत्रालयाने परकीय चलनातील नोटा, चेक व तत्सम, देणगी स्वरूपात स्वीकारण्याबाबतचे रजिस्ट्रेशनचे नूतनीकरण करून परकीय चलनाच्या माध्यमातून देणगी स्वीकारण्यास नुकतीच मान्यता दिलेली आहे. त्यामुळे, भाविकांकडून परकीय चलनाच्या माध्यमातून देणगी स्वीकारणे शक्य होणार आहे, अशी माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

ज्या भाविकांना संस्थानला परकीय चलन अथवा चेकद्वारे देणगी द्यावयाची आहे, त्यांना दक्षिणापेटीत देणगी टाकता येईल. तसेच श्री साईबाबा मंदिर परिसरातील देणगी काऊंटरवर किंवा ऑनलाईनद्वारे भक्तांना देणगी देता येईल, असेही गाडीलकर यांनी सांगितले.

# Press Note

## Shri Saibaba Sansthan Trust,Shirdi Gets Approval to Accept Foreign Currency Donations

Devotees visiting Shirdi for Shri Saibaba's darshan have always contributed generously to the Baba's donation box. Now, with the permission granted by the Ministry of Home Affairs, Government of India, devotees can offer donations in foreign currencies at the feet of Baba.

Shirdi always witnesses a significant crowd of devotees coming for Shri Saibaba's darshan. Among the visitors, there is a notable number of devotees from both within the country and abroad. Devotees currently offer donations at Baba's feet through cash, online transfers, UPI, money orders, and cheques/demand drafts.

The Ministry of Home Affairs, Government of India, has recently renewed the registration for accepting donations in the form of foreign currency notes, cheques, and similar forms of payment. This approval now makes it possible to accept donations through foreign currencies from devotees, as informed by Gorakh Gadilkar, Chief Executive Officer of the Sansthan.

Devotees who wish to donate to the Sansthan in foreign currency or by cheque can place their donations in the donation box. Additionally, devotees can make donations at the donation counters in the Shri Saibaba temple premises or through online methods, Gadilkar further stated.